
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. १५५६२



शिवशाही

# राजधर्म

श्री. के. देवधर



IRBK-0115562



नाट्यरूप शिवशाही
पुस्तक ८ वे
संपादक : डॉ. म. वि. गोखले
एम.ए., पीएच्.डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि. ...आ ...रखेपर्यंत पुस्तक / मासिक

# राजधर्म

( ऐतिहासिक नाटिका )

लेखक
श्री. के. देवधर

IRBK-0115562

प्रकाशन क्रमांक १५५

किमत १ रुपया

"राजधर्म" या नाटिकेचा प्रयोग करण्याच्या परवानगीसाठी पुढील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

पत्ता : सौ. मंगला देवधर ब्लॉक नं. ५ / "लताकुंज" झावबावाडी–
मुंबई नं. २

प्रकाशिका : **सौ. निर्मला नारायण अरगडे, सौ. मालिनी माधव कुलकर्णी**
अरगडे कुलकर्णी प्रकाशन १६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

© सर्व हक्क प्रकाशिकेंच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून १९७४

मुद्रक : सौ. वसुधा रघुनाथ खरे, अक्षर मुद्रणालय, ४७ इंडस्ट्रियल इस्टेट,
नागरगाव, लोणावळा (जि. पुणे)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १५५५६२ नों. दि २५।१।८०
वि. ... स्वार्वा ... क्रं. ...........

नाट्यवेड्या बालमित्रांनो,

हा जून १९७४ ! म्हणजे ठीक ३०० वर्षांपूर्वी (जून १६७४ मध्ये) महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला चेतना देणारी एक महान घटना घडली ! श्रीशिवाजीराजे यांनी हिंदवी राज्याची मुहूर्तमेढ रोवून स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. हिंदवी स्वराज्याचा हा छत्रपती म्हणजे गुणसागरच होता !

जाणिवेच्या रवीला रसिकतेचा दोर लावून या श्रीशिवचरित्ररूपी गुणसागराचे मंथन केले तर नानाविध गुणांचे नवनीत घुसळून वर येते. साहस, शक्ती, युक्ती, न्यायप्रियता, शिस्तप्रियता, दूरदर्शीपणा, नीतिमानता, संस्कारक्षमता–किती किती म्हणून त्यांचे गुण सांगावे !

अशा या लोकोत्तर पुरुषश्रेष्ठाच्या चरित्रातील निवडक प्रसंगाचे नाट्यरूप दर्शन घडवून, त्यांच्या विविध गुणांचा परिचय आमच्या बालमित्रांना करून द्यावा, यासाठी ही **'नाट्यरूप शिवशाही'** निर्माण केली आहे. रंजनाबरोबरच ध्येयसिद्धी असा हा योग आहे. तुम्हाला तो आवडेलच आवडेल !

१९/२७७, लोकमान्यनगर
पुणे ३०
जून १९७४

सूत्रधार– नाट्यरूप शिवशाही

रसिक जनहो,

आता मी "राजधर्म" ही छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या जीवनावरील नाटिका नाट्यरसिकांना सादर करीत आहे.

मासाहेबांच्या निधनानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना किती शोक झाला आणि अखर शोकाला आवर घालून ते राजधर्म बजावण्यास कसे सिद्ध झाले, हे या नाटिकेत दाखविले आहे.

माझ्या "मानाचा मुजरा" या ऐतिहासिक नाटिकेप्रमाणेच "राजधर्म" या नाटिकेचेही नाट्यर्रसिकांकडून हार्दिक स्वागत केंले जाईल, असा विश्वास वाटतो. बहुत काय लिहिणे, कृपा निरंतर वर्धमान असावी ही विनंती.

ब्लॉक नं. ५–"लताकुंज" आपला
झावबावाडी–मुंबई नं. २ श्री. कें. देवधर.

---

# राजधर्म

## या नाटिकेतील प्रवेशानुसार भूमिका

१) बाळाजी आवजी चिटणीस
२) साबाजी
३) पिराजी
४) अण्णाजी दत्तो
५) छत्रपती श्री शिवाजीमहाराज
६) उमाजी पंडित
७) विद्यार्थी
८) सूनबाई
९) विश्वनाथ
१०) कल्याणस्वामी
११) युवराज शंभूराजे
१२) राजारामराजे
१३) पंतप्रधान मोरोपंत
१४) शिलेदार.

# राजधर्म

(स्थळ :–पाचाडच्या राजवाड्यासमोरील प्रांगण–मागच्या बाजूला दूरवर दिसणारा राजवाडा–राजवाड्याच्या मध्यभागी उघडलेला भव्य दरवाजा–दरवाज्याबाहेर दोन्ही बाजूला साबाजी आणि पिराजी हे पहारेकरी–प्रांगणाच्या डाव्या उजव्या बाजूला उंच झाडे आणि रम्य वनश्री–)

(पडदा वर गेल्यावर साबाजी आणि पिराजी गस्त घालतात. इतक्यात मागच्या उघड्या दरवाज्यातून बाळाजी आवजी चिटणीस प्रवेश करतात. साबाजी आणि पिराजी चिटणीसांना मुजरे करतात.)

**चिटणीस :** (मुजऱ्यांचा स्वीकार करीत) काय साबाजी-पिराजी बरे आहात ना ?

**साबाजी :** सरकार, आम्हा गरिबांना काय धाड भरली आहे? पण महाराजांकडे पाहिलं म्हणजे मात्र जिवाची कालवाकालव होते बघा.

**पिराजी :** महाराजांकडे पाहिलं की जिवाला मोठा घोर लागतो.

**चिटणीस :** खरं आहे तुमचं म्हणणं ! आम्ही सर्वजण त्याच काळजीत आहो (अचानक समोर नजर जाऊन) कोण अण्णाजी ? नमस्कार.

(दरवाज्याजवळच्या पायऱ्या उतरून चिटणीस रंगमंचाच्या मध्यभागी येतात. अण्णाजी दत्तो उजव्या बाजूने प्रवेश करतात. दोघे एकमेकांना नमस्कार करतात.)

**अण्णाजी :** नमस्कार चिटणीस.

**चिटणीस** : अण्णाजी, एवढ्या सकाळीच आपण इकडं कुठं ?

**अण्णाजी** : निश्चलपुरी गोसावी यांचेकडे, पुन्हा एकदा करावयाच्या राज्याभिषेकाबद्दल चौकशी करण्याकरता मी गेलो होतो. तिकडून मी नुकताच परत आलो. महाराजांना अहवाल सादर करण्याकरिता गडावर चाललो होतो. परंतु इथं आल्यावर बातमी समजली की, डंकानौबतीशिवाय महाराजांची सडी स्वारी इथंच आली आहे. महाराज इथं कधी आले ?

**चिटणीस** : काल संध्याकाळी. मासाहेबांच्या आठवणीनं महाराजांचं मन अगदी अस्वस्थ झालं. कुणाजवळ काही न बोलता महाराजांनी सरळ गड उतरायला सुरवात केली. खास परिवारातली आम्ही काही मंडळी मागून निघालो. पाचाडच्या या राजवाड्यात आल्यावर महाराजांच्या मनाला जरा बरं वाटलं. महाराज म्हणाले......

**अण्णाजी** : काय म्हणाले महाराज ?

**चिटणीस** : महाराज म्हणाले, चिटणीस मासाहेबांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या वास्तूत आल्यावर आम्हाला मायभेटीचा आनंद लाभतो. मातृछत्र पुन्हा मिळाल्यासारखं वाटतं.

**अण्णाजी** : चिटणीस, महाराजांच्या मनाचं सांत्वन कसं करावं हेच समजत नाही. संत-महंतांनी आणि वयोवृद्धांनी महाराजांचं दुःख हलके करण्याचे परोपरीचे प्रयत्न केले. पण मातृवियोगाचं दुःख महाराज विसरूच शकत नाहीत, त्याला कोण काय करणार ? सदा हसतमुख असणाऱ्या महाराजांची म्लान चर्या पाहून साऱ्या दौलतीला चिंता वाटत आहे.

**चिटणीस** : खरं आहे अण्णाजी ! तुम्ही मंडळी दूर असता, पण महाराजांच्या सहवासात आम्ही अष्टप्रहर असतो. महाराजांचं दुःख आम्हाला पाहवत नाही. महाराजांचं औदासीन्य पाहिलं की, आमचं काळीज फाटून जातं.

**अण्णाजी** : चिटणीस, आमच्यापेक्षा तुम्ही महाराजांना जास्त जवळचे. आपलं मन महाराज तुमच्याजवळ मोकळं करीत असतील.

**चिटणीस** : अण्णाजी, महाराज फारसं बोलतंच नाहीत. आपल्याच दुःखात चूर असतात. महाराजांचे नेत्र सदा पाणावलेले असतात. मासाहेबांची उत्तर-

क्रिया करताना महाराजांच्या डोळ्यातील अश्रूंना कधी खळ पडला नाही. तेच अश्रू आता महाराजांचें कायमचे सोबती झाले आहेत. राजवैभव महाराजांना नकोसं झालं आहे. उंची वस्त्रप्रावरणाला महाराज हात लावीत नाहीत. पंचपक्वान्नांकडे पहातसुद्धा नाहीत. विडासुद्धा खात नाहीत. मऊ सुखशय्येचा त्याग करून, साध्या नवारीच्या माच्यावर महाराज विश्रांती घेतात.

**अण्णाजी** : रात्री महाराजांना निद्रा तरी स्वस्थ लागली का ?

**चिटणीस** : रात्री पाऊस धूमधार कोसळत होता. महाराज अस्वस्थ होते. महाराजांना फार उशीरा झोप लागली. तरी देखील सकाळी महाराज फारच लवकर उठले. त्यावेळी पाऊस पूर्णपणं थांबला होता. वातावरण प्रफुल्लित होतं. पूर्व दिशेनं महाराजांचं लक्ष वेधून घेतलं. भगव्या तांबड्या आकाशावर चुकार ढग रेंगाळत होते. मेघांच्या कडांना जरीची झालर लावल्यासारखी दिसत होती. आजूबाजूची सृष्टी हिरव्या रंगाचं लेणं ल्याली होती. झाडाझुडुपांवरून मोत्यांचे सर ओघळत होते. महाराजांची चित्तवृत्ती प्रसन्न होती. पण अचानक महाराजांना हुंदका आला...

**अण्णाजी** : अरेरे–

**चिटणीस** : बघता बघता महाराज एकदम गंभीर झाले. भरल्या कंठानं म्हणाले, " चिटणीस, उगवत्या सूर्याचं पवित्र दर्शन मासाहेबांना फार आवडत असे. मासाहेब म्हणायच्या, " माणसाचं मन रविराजासारखं असावं. सूर्य भेदाभेद मानीत नाही. सूर्यनारायणाचा प्रकाश राजवाड्यावर आणि गरीबाच्या झोपडीवर सारखाच पडतो, आपल्या तेजानं सारी सृष्टी उजळून टाकतो. "

मासाहेबांचे हे उद्‌गार सांगून महाराज स्तब्ध झाले.

**अण्णाजी** : महाराज आता काय करीत आहेत ?

**चिटणीस** : देवपूजा आटोपून महाराज मघाशीच योगधारणेला बसले आहेत.

**अण्णाजी** : योगधारणेला ?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क. १५५५...

**चिटणीस** : होय. समर्थांनी सांगितल्याप्रमाणं महाराज हल्ली सकाळचा काही वेळ मनःशांतीकरता योगधारणा आणि जपजाप्य यामध्ये व्यतीत करीत असतात. ते पहा आपलं आन्हिक आटोपून महाराज इकडेच येत आहेत.

(मागच्या उघडचा दरवाज्यातून शिवाजी महाराज संथ पावले टाकीत रंगमंचावर येतात. महाराजांची मुद्रा गंभीर असते. साबाजी, पिराजी, चिटणीस आणि अण्णाजी महाराजांना पटापट मुजरे करतात. महाराज मुजऱ्यांचा स्वीकार करतात.)

**महाराज** : अण्णाजी, तुम्ही इकडं कुणीकडं ? आम्ही पाचाडला येणार असल्याचं तुम्हाला कळविलं नव्हतं. आम्ही येथे आहोत हें तुम्हाला कुणी सांगितलं ?

**अण्णाजी** : महाराज, आपण कुठं आहो हे सूर्याला सांगावं लागत नाही. त्याचे अग्रदूत ते काम अगोदरच करतात.

**महाराज** : अण्णाजी, तुम्हीसुद्धा आमच्या शंभूराजाप्रमाणं काव्यमय भाषेत बोलू लागतात. ठीक. आता सांगा, इतक्या सकाळी आमच्या भेटीला येण्याचं कारण ? काही विशेष ?

**अण्णाजी** : महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणं मी निश्चलपुरी गोसावी यांची भेट घेतली. पुन्हा करावयाच्या दुसऱ्या राज्याभिषेकाबद्दल त्यांच्याजवळ चर्चा केली. आपण या बाबतीत काही निर्णय घेतला असेलच......

**महाराज** : नाही अण्णाजी, आम्ही अद्याप कोणताच निर्णय घेतला नाही. आमच्या मनाची अवस्था मोठी चमत्कारिक झाली आहे. काय करावं हे सुचत नाही. मासाहेब गेल्यापासून आमची विचारशक्ती पांगळी झाल्यासारखी वाटते. मासाहेबांच्या आठवणीनं मन अस्वस्थ होतं. गडावर चैन पडत नाहीसं झालं की, आम्ही इथं पाचाडला येतो. इथं आल्यावर जणू मासाहेबांना भेटल्यासारखं वाटून मन शांत होतं. पण ही मनाची शांतता फार काळ टिकत नाही. मासाहेबांच्या आठवणी मनात पुन्हा फेर धरू लागतात आणि जिवाची तगमग सुरू होते. आता सकाळचीच गोष्ट घ्या...

**अण्णाजी** : कोणती गोष्ट महाराज?

**महाराज** : सांगतो. नित्याप्रमाणं आम्ही स्नानाकरता मागच्या विहिरीवर गेलो. विहीर अगदी काठोकाठ भरलेली होती. त्या विहिरीच्या पाण्यात आम्हाला मासाहेब दिसल्या आणि चटकन आमच्या तोंडून उद्‌गार निघाले, "मासाहेब !" बाजूला उभा असलेला हैबती आमच्याकडे आश्चर्याने पाहू लागला. मग कठोर वस्तुस्थितीची आम्हाला जाणीव झाली. ( निःश्वास टाकून चिटणीस, विहीर बांधण्याच्या वेळचा प्रसंग तुम्हाला आठवतो ?

**चिटणीस** : क्षमा असावी महाराज. माझ्या काही लक्षात येत नाही.

**महाराज** : ऐका तर. पाचाडचा हा राजवाडा बांधून तयार होत आला. एक दिवस नित्याप्रमाणं आम्ही मासाहेबांच्या दर्शनाला गेलो असताना मासाहेबांनी विचारलं, (महाराज भावनावश होऊन भारावल्यागत बोलू लागतात)

" शिवबा, पाचाडच्या वाड्याचं काम कोठपर्यंत आलं? "

" पुढच्या पौर्णिमेच्या आत राजवाडा तयार होईल मासाहेब. "

" शिवबा ... ... "

" आज्ञा मासाहेब. "

" आम्हीं असं ऐकलं आहे की, पाचाड गावी पाण्याची चांगली सोय नाही. मला वाटतं आपल्या नव्या वाड्याजवळ मोठी विहीर बांधावी, म्हणजे रयतेची पाण्याची चांगली सोय होईल. "

" अवश्य मासाहेब. मुहूर्त पाहून विहीर खोदण्याची आज्ञा देतो. "

(महाराज जरा वेळ स्तब्ध रहातात. मग भानावर येऊन पुन्हा बोलू लागतात.)

विहिरीचं काम पुरं झालं. मासाहेबांना अतिशय आनंद झाला आणि आज पाण्यानं तुडुंब भरलेली ती विहीर पाहून, मासाहेबांची आठवण होऊन, आमच्या डोळ्यातून गंगायमुना दुथडी भरून वाहू लागल्या.

**चिटणीस** : महाराजांनी शांत व्हावं!

**महाराज** : शांत कसं व्हावं हेच आम्हाला कळत नाही. कधी कधी समजतं पण उमजत नाही. नियतीनं आमच्याशी असा क्रूर खेळ का खेळावा, असा प्रश्न आमच्या मनापुढं वारंवार निर्माण होतो. निरंकुश आणि निर्भेळ

असं सुख आतापर्यंतच्या आमच्या जीवनात आम्हाला कधीच लाभलं नाही. अलौकिक माता मिळाली पण पित्याचा सहवास फारसा लाभला नाही. स्वराज्य उभारताना रक्तामांसाच्या स्वबांधवांनीच काही वेळा आम्हाला विरोध केला. राज्यारोहणाचा सोहळा पार पडला आणि मासाहेब आम्हाला कायमच्या सोडून गेल्या. सुखा पाठोपाठ दुःखानं आमची पाठ कधीही सोडली नाही.

**अण्णाजी** : महाराजांनी एखादी नवीन मोहिम हाती घ्यावी म्हणजे तेवढाच महाराजांच्या मनाला दुःखाचा विसर पडेल.

**महाराज** : अण्णाजी, तुम्ही सुचविलेली नव्या मोहिमेची मसलत बरोबर आहे. पण असं वाटतं, आता हे सारं कशाकरता करायचं ? आमच्या पराक्रमाचं कौतुक करायला आता मासाहेब कुठं आहेत ? खरोखर मासाहेबांच्या मागोमाग जर आम्हीही......

**चिटणीस** : नाही, नाही. महाराजांनी असं बोलू नये. राणीसाहेबांचा, युवराजांचा विचार करावा. स्वतःला सावरावं.

**महाराज** : चिटणीस, आम्ही आता काहीच बोलत नाही, आपण दूर कुठं तरी जाऊन येऊ.

**अण्णाजी** : महाराज, डंकानौबत बरोबर न घेता......

**महाराज** : डंकानौबतीची काही एक जरुरी नाही.

**अण्णाजी** : महाराज, एवढया लवकर आपण बाहेर पडणार ? अद्याप पाचाडची बाजारपेठसुद्धा उघडली नसेल......

**महाराज** : अण्णाजी, आम्ही काही खरेदीला निघालो नाही, कोंडलेलं मन मोकळं करायला चाललो आहो.

**अण्णाजी** : महाराज, मी निश्चलपुरींना काय कळवू ?

**महाराज** : सध्या काहीच कळवू नका. अण्णाजी, तुम्ही इथंच विश्रांती घ्या. सैरभैर झालेलं आमचं मन स्थिरावलं, म्हणजे जरूर ती मसलत करू. चला चिटणीस.

**चिटणीस** : चलावं महाराज. पालखी सज्ज आहे.

**महाराज** : पालखी ? पालखीची काही जरूर नाही. आम्ही घोड्यावरूनच जाऊ. खोगीर चढवून घोडे तयार आहेत ना ?

**चिटणीस** : घोडे तयार आहेत महाराज. पण माझी एक विनंती आहे.

**महाराज** : बोला चिटणीस.

**चिटणीस** : महाराज, पावसामुळं रस्ते खराब झालेले आहेत. अशा वेळी घोड्यावरून जाणं धोक्याचं आहे. शिवाय आपलं मनही...

**महाराज** : चिटणीस, तुम्ही किती आमची काळजी करता ? आमची काळजी करता करताच तुम्ही थकून जाल. पावसाळ्यात घोड्यावरून जाण्याचा आमचा हा काही पहिलाच प्रसंग नाही. तुम्ही चिंता करू नका. चला.

(महाराज आणि चिटणीस उजव्या बाजूने निघून जातात. साबाजी, पिराजी आणि अण्णाजी हे महाराजांच्या पाठमोऱ्या आकृतीला मुजरा करीत असतानाच पुढचा पडदा पडतो.)

(त्यानंतर घोड्यांच्या टापांचा प्रथम संथ आवाज, नंतर त्या आवाजाला थोडी गती येते. मग पावसाचा, सोसाट्याच्या वाऱ्याचा आवाज सुरू असतानाच पुढचा दर्शनी पडदा वर जातो. मागचा पडदा अरण्याचा असतो. महाराज आणि चिटणीस डाव्या बाजूने प्रवेश करतात. दोघेही अंगावर उडालेले पाणी छोट्या वस्त्राने झटकीत असतात.)

**महाराज** : चिटणीस, मोतद्दाराला घोडे निवाऱ्याच्या जागी बांधून ठेवायला सांगितले आहेत ना ?

**चिटणीस** : होय महाराज ! पावसाची मोठी सर येणार असं वाटतं.

**महाराज** : तुमचं म्हणणं बरोबर आहे. आमचं बाहेर फिरणं निसर्गाला मंजूर दिसत नाही.

**चिटणीस** : महाराज. आपण कुठंतरी आडोश्याला जाऊ या.
(एवढ्यात पड्यातून " रामः रामौ रामा " अशी रूपे विद्यार्थ्यांनी पाठ केलेली चारपाच वेळा मोठ्यांदा ऐकू येतात)

**महाराज** : चिटणीस, हा विद्याभ्यास कुठं चालला आहे ?

**चिटणीस** : महाराज, माझ्या लक्षातच नाही. इथं पलीकडे उमाजी पंडितांची

पाठशाळा आहे.

**महाराज** : ठीक आहे. पावसाची सर जाईपर्यंत आपण तिथंच थांबू. विद्वत्-जनांच्या सहवासात आम्हाला तेवढाच संतोष वाटेल.

(महाराज आणि चिटणीस पुढे जात असताना अरण्याचा देखावा असलेला पडदा वर जातो आणि मागच्या बाजूला पाठशाळेचा देखावा दिसू लागतो. डाव्या बाजूला उंच बैठक असून, उजव्या बाजूला विद्यार्थी खाली बसून रूपे पाठ करीत असतात. महाराजांना पाहून स्वतः उमाजी पंडित पुढे येतात)

**उमाजी पंडित** : यावं महाराज, यावं. आम्हाला अगोदर कळलं असतं, तर शिष्य परिवारासह स्वागताकरता पुढं आलो असतो.

**महाराज** : त्याची काही आवश्यकता नाही. विद्वत्तेचा परामर्ष राजसत्तेनं घ्यावा असं आमचं मत आहे. सकाळीच आम्ही बाहेर पडलो. अचानक पावसाला सुरवात झाली. चिटणीसांनी तुमची पाठशाळा जवळ असल्याचं सांगितलं आणि आम्ही इथं आलो.

**उमाजी पंडित** : म्हणजे वरुणराजानं आज आमच्यावर मोठा अनुग्रहच केला म्हणायचा. त्या निमित्तानं तरी आपलं येणं झालं. मुलांनो, छत्रपती महाराजांना अभिवादन करा.

**विद्यार्थी** : छत्रपती महाराजांचा विजय असो. महाराजांनी आमच्या अभिवादनाचा स्वीकार करावा.

(विद्यार्थी महाराजांना अभिवादन करतात.)

**महाराज** : ऊठा, औक्षवंत व्हा. चिटणीस,

**चिटणीस** : जी महाराज.

**महाराज** : या बटूंना प्रत्येकी एकेक होन द्या.

(चिटणीस प्रत्येकाला एकेक होन देतात. महाराजांना नमस्कार करून बटू होनांचा स्वीकार करतात)

**महाराज** : उमाजी पंडित, हा तरतरीत मुलगा कोण ?

**उमाजी पंडित** : आपल्या भास्कर पंडितांचा हा विश्वनाथ, मोठा हुशार मुलगा आहे. सध्या इथं रघुवंश शिकत असतो.

**महाराज** : ठीक.

**उमाजी पंडित** : (आत पहात) सूनबाई जरा बाहेर ये.

(उमाजी पंडितांची लहानगी सूनबाई बाहेर येते. डोक्यावर पदर, अंगावर सौभाग्यालंकार, सूनबाई महाराजांच्या पाया पडते)

**सूनबाई** : (खाली वाकून तीन वेळा नमस्कार करीत) महाराज, नमस्कार करते.

**महाराज** : अखंड सौभाग्यवती भव. ऊठ सूनबाई. चिटणीस,

**चिटणीस** : जी महाराज.

**महाराज** : गडावर गेल्यानंतर उमाजी पंडितांच्या सूनबाईकरता साडीचोळी आणि खणानारळाची ओटी पाठविण्याची व्यवस्था करा.

**चिटणीस** : जशी आज्ञा.

**महाराज** : उमाजी पंडित, आपले चिरंजीव कोठे दिसत नाहीत?

**उमाजी पंडित** : मुलगा कालच आळंदीला गेला आहे.काही पोथ्यांच्या नकला करून आणावयाच्या आहेत.

**महाराज** : आपल्या पाठशाळेचं कार्य व्यवस्थित सुरू आहे ना ? काही अडचण ?

**उमाजी पंडित** : सर्व काही व्यवस्थित सुरू आहे. काही अडच ण उपस्थित झाल्यास आम्ही आपणास अवश्य कळवू. महाराजांनी थोडं धारोष्णं दूध घ्यावं (आत पहात) सूनबाई, थोडं दूध आण बरं ...

**महाराज** : उमाजी पंडित, आम्ही अलीकडे ... ... ... ...

**चिटणीस** : मासाहेब गेल्यापासून महाराज कुठं काही घेत नाहीत.

**उमाजी पंडित** : चिटणीस, शेकडो वर्षांनंतर हिंदूंना छत्रपती लाभले. राज्याभिषेकानंतर कधी नव्हे ते पहिल्या प्रथमच छत्रपतींचं आगमन प्रातःकाली आमच्या आश्रमात झालं. अशा परिस्थितीत छत्रपती समक्ष आले, पण काही न घेताच गेले, असं झालं तर ती गोष्ट या वास्तूच्या मनाला कायमचं दुःख देईल.

**महाराज :** उमाजी पंडित, तुमचंही म्हणणं बरोबर आहे. आम्ही घेऊ थोडं दूध.

(महाराज डाव्या बाजूच्या उच्चासनावर बसतात. उमाजी पंडितांची सूनबाई दुधाने भरलेले रुप्याचे फुलपात्र आदबीने महाराजांसमोरच्या चौरंगावर ठेवते. विश्वनाथ दुधाने भरलेले दुसरे रुप्याचे फुलपात्र चिटणीसांचे हाती देतो.)

**चिटणीस :** (दबक्या आवाजात) उमाजी पंडित, जरा इकडे या. (उमाजी पंडित आणि चिटणीस उजव्या बाजूला जातात) तुम्ही फार मोठी कामगिरी बजावलीत.

**उमाजी पंडित :** ती कशी काय ?

**चिटणीस :** कालपासून महाराजांनी काही खाल्लेलं नव्हतं. तुमच्याकडे आल्यामुळे आता थोडं दूध तरी त्यांच्या पोटात गेलं.

**महाराज :** काय म्हणता चिटणीस ?

**चिटणीस :** काही नाही महाराज.

**महाराज :** उमाजी पंडित, आपल्या कार्यात खंड पडण्याचं कारण नाही. आम्ही इथं खुशाल आहो. विद्यार्थ्यांचा अभ्यास चालू द्या.

(महाराज दूध पितात. त्यांनी चौरंगावर ठेवलेलं रुप्याचं फुलपात्र सूनबाई घेऊन जाते. चिटणीसांचे फुलपात्र दुसरा विद्यार्थी घेऊन आत जातो आणि बाहेर परत येऊन आपल्या जागेवर बसतो. विद्यार्थी हलक्या आवाजात रूपे पाठ करू लागतात)

**विश्वनाथ :** गुरुजी, एक शंका आहे.

**उमाजी पंडित :** ती कोणती ?

**विश्वनाथ :** "मरणं प्रकृतिः शरीरिणाम्" हे वचन जरा चमत्कारिक वाटतं.

**उमाजी पंडित :** त्यामध्ये चमत्कारिक वाटण्यासारखं काय आहे? या काव्यपंक्तीतील अर्थ संपूर्णपणे बरोबर आणि समर्पक आहे.

**विश्वनाथ :** तो कसा गुरुजी ?

**उमाजी पंडित :** सांगतो. अजराजाचं सांत्वन करण्याकरता हा उदात्त विचार

सांगितलेला आहे. वशिष्ठ गुरूंना अंतर्ज्ञानानं अजराजा दुःखमोहित झाल्याचं समजलं. म्हणूनच अशा प्रकारचा उपदेश वशिष्ठांनी केला. मरण हा देह धारण करणारांचा स्वभावच आहे. निसर्गाला ते धरूनच आहे. ज्ञानी लोकांनी, श्रेष्ठ राजपुरुषांनी हे तत्त्व समजावून घेऊन आपल्या दुःखाला आवर घातला पाहिजे. राजपुरुषांनी प्राकृत जनाप्रमाणं वागणं योग्य नाही. वृक्ष आणि पर्वत जर वाऱ्यानं हलू लागलें तर कसं चालेल?

**विश्वनाथ** : गुरुजी, माझी शंका दूर झाली.

**महाराज** : उमाजी पंडित, तुम्ही सांगितलेलं स्पष्टीकरण विचारांना चालना देणारं आहे.

(" जय जय रघुवीर समर्थ " ची घोषणा पडद्यातून ऐकू येते. त्यानंतर समर्थशिष्य कल्याण उजव्या बाजूने प्रवेश करतात)

**महाराज** : कोण कल्याणस्वामी ? सद्‌गुरू स्वामी समर्थांची प्रकृती ठीक आहे ना?

**कल्याणस्वामी** : प्रभू रामचंद्राच्या कृपेनं सारं काही ठीक आहे. गुरुदेवांनी खास निरोप सांगण्याकरता मला मुद्दाम पाठविलं आहें. मी गडावरच निघालो होतो, परंतु वाटेत आपण इकडे आल्याचं समजलं म्हणून इकडे आलो.

**महाराज** : गुरुदेवांचा काय निरोप आहे?

**कल्याणस्वामी** : महाराज, सद्‌गुरूंचेच शब्द मी आपणाला सांगतो. गुरुदेवांचं सांगणं आहे, " शिवाजीराजे, आपण ज्याप्रमाणं मासाहेबांचे सुपुत्र आहात, त्याचप्रमाणं स्वराज्याचे छत्रपती आहात हे लक्षात घ्यावं. शोकमग्न होऊन राजधर्म विसरू नये. आपण उत्साहानं राज्यकारभारात लक्ष घालू लागल्याचं लौकरच आमच्या कानी येवो, हीच श्रीरामचरणी प्रार्थना.

**महाराज** : कल्याणस्वामी, गुरुदेवांचं सांगणं आम्ही शिरोधार्य मानतो. त्यांचा उपदेश आम्ही जरूर लक्षात घेऊ. समर्थांना आमचे प्रणाम सांगा.

**कल्याणस्वामी** : अवश्य. येतो आम्ही. (" जय जय रघुवीर समर्थ" असा गजर करीत कल्याणस्वामी निघून जातात. गजर अस्पष्ट होत जातो)

(याच वेळी घोड्यांच्या टापांचा आवाज येऊ लागतो. टापांचा आवाज जवळ येऊन थांबतो)

**चिटणीस** : (डाव्या बाजूकडे पहात) महाराज, समोर पाहिलंत ? शंभूराजे इकडे येत आहेत. शंभूराजांच्या कडेवर राजारामराजे आहेत. बरोबर मोरोपंतही आहेत.

(डाव्या बाजूने शंभूराजे येतात. शंभूराजांच्या कडेवर राजारामराजे आहेत. त्यांच्यामागून मोरोपंत येतात. त्यांच्या पाठोपाठ दोन शिलेदार येतात)

**शंभूराजे, राजारामराजे** : मुजरा, आबासाहेब.

(डाव्या बाजूने आत आलेले सर्वजण महाराजांना पटापट मुजरे करतात)

**महाराज** : (गहिवरून) अरे का, आज आमचे दोन्ही छावे आणि प्रधानपंत एकदम आमच्या भेटीला आले ? (काळजीच्या स्वरात) शंभूराजे, गडावरची सर्व मंडळी ठीक आहेत ना ?

**शंभूराजे** : होय आबासाहेब.

**महाराज** : मग असं इथं अचानक येण्याचं कारण? (सौम्य स्वरात) शंभूराजे, तुम्हाला माहीत आहे, राजारामराजांची प्रकृती नाजूक आहे. अशा पाऊसपाण्यात बाहेर फिरणं त्यांच्या लहान वयाला सोसायचं नाही.

**राजारामराजे** : आबासाहेब, आम्ही आता लहान नाही हं आणि नाजूक मुळीच नाही. आबासाहेब, आम्ही इथं येण्यात दादासाहेबांची मुळीच चूक नाही. आम्ही हट्ट धरला, म्हणूनच दादासाहेबांनी आम्हाला इथ आणलं.

**महाराज** : वा छान. बंधूबंधूंचं हे प्रेम असंच कायम टिको म्हणजे झालं.

**शंभूराजे** : आमच्याबद्दल विश्वास वाटत नाही ?

**महाराज** : आम्ही कधी अविश्वास दाखविला आहे ? पण शंभूराजे वेळप्रसंगी तुम्हाला भान रहात नाही. एक प्रश्न विचारू ?

**शंभूराजे** : हे काय विचारणं आबासाहेब ? आपल्या कोणत्याही प्रश्नांचं आम्ही खरं तेच उत्तर देऊ.

**महाराज :** राजारामराजांसह गड सोडताना राणीसाहेबांची परवानगी घेतलीत ?

**शंभूराजे :** नाही, आबासाहेब.

**महाराज :** हे शिरस्त्याला धरून झालं नाही.

**शंभूराजे :** (नरमाईने) आम्ही प्रत्यक्ष जरी परवानगी घेतली नाही, तरी आम्ही इकडे आलो आहो, हे राजारामराजांच्या मातोश्रींना माहीत आहे.

**महाराज :** राजारामराजांच्या मातोश्री ? असं का म्हणता ? त्या तुमच्याही मातोश्री आहेत.

**शंभूराजे :** आबासाहेब, काल संध्याकाळी आपण गड सोडून एकाएकी खाली गेलात आणि आम्हाला अगदी एकाकी वाटू लागलं. काही न बोलता आपण निघून गेलात. आम्हाला वाटलं तुम्ही आमच्यावर रागावलात. तिन्हीसांजा गडाचे दरवाजे बंद झाले. आमच्या मनात विचार आला की, रात्रीच्या काळोखात बेधडक आडवाटेनं गड उतरून आपणाकडे यावं. आपल्या तान्हुल्याच्या मायेपोटी भर रात्री गड उतरून जाणाऱ्या हिरा गवळणीची आम्हाला आठवण झाली. रात्र आम्ही कशीबशी काढली. उजाडताच आपल्या दर्शनाकरता आम्ही पाचाडची वाट धरली.

**मोरोपंत :** मध्ये बोलल्याबद्दल क्षमा असावी, महाराज.

**महाराज :** बोला पंत, जे काही बोलायचं असेल ते खुल्या दिलानं बोला.

**मोरोपंत :** महाराज, काल संध्याकाळी आपण गड सोडल्यानंतर, शंभूराजांनी रात्रीचं जेवण घेतलं नाही. त्यामुळं युवराज्ञींनीही थाळ परत पाठविला. छोटे राजारामराजेसुद्धा काही न खाता झोपी गेले. राजगृहात कुणीच जेवलं नाही.

**महाराज :** अरेरे ! आमच्यामुळं सर्वांना उपास घडला. आम्ही कोणालाही न सांगतासवरता निघालो हे योग्य झालं नाही.

**शंभूराजे :** असं नाही आबासाहेब.

**महाराज :** मग कसं शंभूराजे ? मासाहेब गेल्यानंतर तुम्ही जेवत नाहीसे झालात. तेव्हा आम्ही तुम्हाला बजावलं होतं की, शरीरधर्म कुणाला सुटलेले नाहीत. शरीरसंरक्षणाकरता अन्न घ्यायचं आठवतं ना ?

**शंभूराजे** : बरोबर आठवतं, आबासाहेब. पण या बाबतीत आम्ही आपली आज्ञा पाळू शकत नाही, याबद्दल दिलगीर आहो.

**महाराज** : मतलब ?

**शंभूराजे** : मतलब काय सांगू ? सांगतो. आपण आम्हाला अन्नग्रहण करण्याची आज्ञा करता, स्वतः मात्र कधी जेवता, कधी जेवत नाही. खातपीत नाही. आमच्याशी अलीकडे धड बोलतसुद्धा नाहीं. कुणाचाच निरोप न घेता आपण काल गड उतरलात. रात्रीच्या जेवणाची वेळ झाली. आमच्या मनात विचार आला, आबासाहेब आता काय करीत असतील ? चार घास अन्न घेतलं असेल की नाही ? आमच्या मनाची तडफड सुरू झाली...

**महाराज** : शंभूराजे, शांत व्हा.

**शंभूराजे** : शांत कसे होऊ ? आबासाहेब, आपण उपाशी राहिल्यावर आमच्या घशाखाली घास कसा उतरेल? छे, आता हे सहन होत नाही. आबासाहेब, आम्ही आपल्याला न्यायला आलो आहो. आपण जिथं जाल तिथं आम्ही येऊ. आपण नेहमीप्रमाणं खाणंपिणं सुरू करीपर्यंत आम्ही अन्नाला स्पर्शसुद्धा करणार नाही.

**महाराज** : शंभूबाळ, असा आततायीपणा करणं चांगलं नाही. जगात काही दुःखं अशी असतात की जी ज्याची त्यालाच भोगावी लागतात. आमचं दुःखं आम्हालाच सोसलं पाहिजे, तुम्हाला ते समजणार नाही.

**शंभूराजे** : आबासाहेब, असं कसं म्हणता ? आपलं दुःख काय वेगळं आहे ? आपल्या दुःखात आम्हीही वाटेकरी आहो. मासाहेबांच्या निधनामुळं आम्ही खरे पोरके झालो आहो. आमच्या आईसाहेब कशा होत्या, हे आम्हाला आठवतसुद्धा नाही. मासाहेबांनीच आम्हाला वाढविलं, आईची माया दिली. मासाहेब गेल्या, आमचं सर्वस्व गेलं. मग आम्ही काय करावं?

**महाराज** : (जडावलेल्या आवाजात) शंभूराजे, तुमचा सवाल योग्य आहे. आम्ही आमच्याच दुःखात चूर झालो. तुमचा विचार पाहिजे तेवढा केला नाही. चूक झाली आमची...

**शंभूराजे** : (अधीरपणे) असं नका बोलू आबासाहेब. अधिकउण्या शब्दाबद्दल

क्षमा करा. आमच्या बोलण्याचा आशय इतकाच होता की, आपणच जर असे उदास झालात, तर आमचे अश्रू कोण पुशील? आम्हाला मायेनं जवळ कोण घेईल ?

(शंभूराजे आणि महाराज आपापले अश्रू टिपतात. छोटे राजाराम-राजे महाराजांच्या गळ्याला मिठी मारतात. महाराज राजारामांना कडेवर घेतात.)

**राजारामराजे** : (स्फुंदत) आबासाहेब, आपल्या डोळ्यात पाणी आलं की दादासाहेबांचे नेत्र वाहू लागतात आणि मग आम्हालाही रडू कोसळतं हो!

**महाराज** : (गहिवरून) राजारामराजे, रडू नका (राजारामराजांचे महाराज डोळे पुसतात) शंभूराजे...

**शंभूराजे** : काय आबासाहेब?

**महाराज** : काल रात्रभर आमच्या डोळ्याला डोळा लागला नाही. अस्वस्थ मनाला शांत करण्याकरता आम्ही सकाळी बाहेर पडलो. वाटेत पाऊस कोसळू लागल्यामुळं, आम्ही या आश्रमात आलो. "मरणं प्रकृतिः शरीरिणाम्" या काव्यपंक्ती इथं आमच्या कानावर पडल्या. आमचं मन भारून गेलं. त्या शब्दांचे प्रतिध्वनी या डोंगरदऱ्यातून उमटल्याचा भास होऊ लागला. त्याच वेळी सद्गुरू समर्थांचा निर्वाणीचा संदेश कल्याणस्वामींनी आम्हाला सांगितला. शोकानं बधीर झालेल्या आमच्या मनात चैतन्य निर्माण झालं. पहाटे पडलेलं स्वप्न आम्हाला स्पष्टपणे आठवू लागले. शंभूराजे, पहाटे मासाहेब आमच्या स्वप्नात आल्या होत्या.

**शंभूराजे** : (महाराजांचे हात घट्ट पकडीत) काय म्हणाल्या ?

**महाराज** : सांगतो, (महाराज राजारामराजांना शंभूराजांचे कडेवर देतात) मासाहेब म्हणाल्या, (स्वर बदलून) शिवबा, आमच्या आठवणीनं असा किती दिवस शोक करत बसणार ? राज्यकारभाराची कामं अशानं खोळंबून राहतील. या जगात अमर कोणीही नाही. एवढे मोठे राम-कृष्ण, पण त्यांनाही एक दिवस जग सोडून जावं लागलं. शोक आवर. विवेक करून कारभाराला

लाग. राजधर्म विसरू नको......

**शंभूराजे :** मासाहेब आमच्याबद्दल काही बोलल्या नाहीत ?

**महाराज :** बोलल्या तर. मासाहेब म्हणाल्या, आईविना पोरक्या झालेल्या शंभूबाळाला आम्ही परवापर्यंत वाढविलं. यापुढं तुलाच शंभूबाळाची आई झालं पाहिजे. औदासीन्य सोडून स्वराज्याच्या कामाला लागलं पाहिजे.

**शंभूराजे :** आबासाहेब, मासाहेबांचं सांगणं ऐकणार ना ?

**महाराज :** ऐकलंच पाहिजे. मासाहेबांची अवज्ञा आम्ही कधीही केली नाही. मोरोपंत...

**मोरोपंत :** आज्ञा महाराज.

**महाराज :** आजच प्रधानमंडळाच्या बैठकीची व्यवस्था करा. चिटणीस–

**चिटणीस :** जी, महाराज.

**महाराज :** बहिर्जी नाईकांना बोलावून घ्या. राज्याची हालहवाल आम्हाला समजून घेतली पाहिजे.

(पडद्यातून डंका नौबतींचा, कर्णे तुताऱ्यांचा आणि रणशिंगाचा आवाज ऐकू येतो.)

**महाराज :** (आश्चर्याने)–हा डंका नौबतींचा आवाज कुठून येतो आहे ?

**शंभूराजे :** छत्रपतींना नेण्याकरता आम्ही डंकानौबती आणि सारा लवाजमा बरोबर आणला आहे. छत्रपतींनी चलावं.

**महाराज :** (हसत) चला युवराज. जय शंभो ! जय भवानी !

(महाराज, युवराज, छोटे युवराज, मोरोपंत, चिटणीस जाऊ लागतात. पडद्यातून आवाज येतो, "छत्रपती शिवाजी महाराज की जय" डंका नौबती पुन्हा वाजू लागतात आणि पडदा पडतो.)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क. १५५९६२ नों. दि. २५।९।०७
वि. ना.का...